प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

ऑक्टोबर 24, 2017

**आयडीएफसी बँक लि. ह्यांचेवर आरबीआयकडून आर्थिक दंड लागु**

ऑक्टोबर 23, 2017 रोजी भारतीय रिझर्व बँकेने, आयडीएफसी बँक लि. (बँक) ह्यांना, कर्जे व अग्रिम राशींवरील विनियामक निर्बधांचे उल्लंधन केल्याबाबत रु.20 दशलक्ष दंड लागु केला आहे. आरबीआयने दिलेल्या काही निदेशांचे वरील बँकेने पालन न केल्याचे विचारात घेऊन, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 46(4)(1) सह वाचित कलम 47अ(1)(क) ने दिलेल्या अधिकारांचा वापर करुन आरबीआयने हा दंड लागु केला आहे.

विनियामक बाबींचे अनुपालन न केल्यानेच ही कारवाई करण्यात आली असून, त्याचा संबंध ग्राहकांशी केलेले व्यवहार किंवा करारांच्या वैधतेशी नाही.

**पार्श्वभूमी**

वरील बँकेच्या वित्तीय स्थितीवरील दर्जा-अहवालामध्ये, इतर बाबींबरोबर, कर्जे व अग्रिम राशींचे नूतनीकरण/मंजुरी संबंधाने असलेल्या काही निदेशांचे पालन करण्यात आले नसल्याचे दिसून आले. ह्या दर्जा - अहवालावर आधारित, आरबीआयने दिलेल्या निदेशांचे अनुपालन न केल्याने, दंड का लावण्यात येऊ नये ह्याबाबत एक कारणे दाखवा नोटिस वरील बँकेला ऑगस्ट 7, 2017 रोजी पाठविण्यात आली होती. ह्यावर वरील बँकेने दिलेले लेखी उत्तर व वैय्यक्तिक सुनावणीतील मौखिक सादरीकरण विचारात घेऊन, रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की, आरबीआयने दिलेल्या निदेशांचे पालन न करणे हे प्रत्यक्षात घडले असून त्यासाठी आर्थिक दंड लावणे आवश्यक आहे.

**जोस जे कत्तूर**
मुख्य महाव्यवस्थापक

**वृत्तपत्र निवेदन : 2017-2018/1117**